सोमवार, २७ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ७०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग


व्यापारी, दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप/३

भाजपच्या 'रास्ता रोको'ला पत्रकार संघाचा पाठिंबा/४

खो खो : महाराष्ट्राला सलग सातवा दुहेरी मुकुट/६


## अमेरिका दौऱ्याहून परतलेल्या पंतप्रधान मोदींचे जोरदार स्वागत



**नवी दिल्ली** : अमेरिकेच्या तीन दिवसांच्या दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि. २६) सकाळी भारतात परतले. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि इतरांनी दिल्ली विमानतळावर पंतप्रधान मोदींचे जंगी स्वागत केले. या वेळी कार्यकर्त्यांनी जयजयकाराच्या घोषणा दिल्या, तर पंतप्रधानांनी सर्वांचे आभार मानले. पंतप्रधान मोदींनी अमेरिका दौऱ्यात सलग अनेक बैठका घेतल्या. ते जवळपास ६५ तास अमेरिकेत होते आणि या दरम्यान त्यांनी २० बैठकांमध्ये उपस्थिती लावली, तसेच अमेरिकेला जाताना आणि परतताना पंतप्रधान मोदींनी विमानातही अधिकाऱ्यांसोबत चार बैठका घेतल्या. मुख्य म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेला संबोधित केले. राजधानी दिल्लीत पंतप्रधान मोदींचे समर्थक आणि कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात जंगी स्वागत केले.

# कोल्हापूरला जाणारच, अटक करून दाखवा!

## किरीट सोमय्यांचे महाविकास आघाडी सरकारला आव्हान

**अलिबाग : प्रतिनिधी**

**मुंबईत सिद्धिविनायकाचे दर्शन घेऊन मी मंगळवारी माझ्या कोल्हापूर यात्रेला प्रारंभ करणार असून आजन्म प्रवेशबंदी घालणाऱ्या मुरगुड नगर परिषदेच्या हद्दीत जाऊन ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणार आणि तेथेच मुश्रीफ यांचा तिसरा घोटाळा उघड करेन. हिंमत असेल तर मला अटक करून दाखवा, असे आव्हान भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महाविकास आघाडी सरकारला दिलेय.**




(छाया : मिलिंद शिगवण)

### कर्नाळा बँक ठेवीदारांचे पैसे परत मिळवून देऊ!

कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणात शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांना अटक होऊन तीन महिने झाले, पण महाविकास आघाडी सरकार त्यांची मालमत्ता जप्त करीत नाही. आम्ही विवेक पाटील यांची ७०० कोटींची मालमत्ता विकायला लावून त्यातून ५२ हजार ठेवीदारांचे पैसे परत मिळवून देऊ, असे सोमय्या म्हणाले.

अलिबाग व मुरूड तालुक्यातील भाजप पदाधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक रविवारी (दि. २६) अलिबाग येथील हिरालक्ष्मी सभागृहात आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी सोमय्या बोलत होते. भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सतीश लेले, शहर सरचिटणीस अजय भाकरे, संतोष पाटील यांच्यासह अलिबाग व मुरूड तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश भ्रष्टाचारमुक्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. आपल्या पक्षाने माझ्यावर महाराष्ट्र भ्रष्टाचारमुक्त करण्याची जबाबदारी सोपवली आहे. ती मी पार पाडणार आहे. त्याची सुरुवात झाली आहे. मला कितीही अडविण्याचा प्रयत्न केला, प्रवेशबंदी केली, जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या तरी मी घाबरणार नाही. मी माझे काम करीत राहणार. महाराष्ट्र भ्रष्टाचारमुक्त करणार. महाराष्ट्राच्या जनतेने आता भ्रष्टाचाराविरोधात क्रांती सुरू केली आहे. ती कुणी थांबवू शकणार नाही. पक्षातील कार्यकर्त्यांनी धाडस दाखवून आपला तालुका भ्रष्टाचारमुक्त करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन किरीट सोमय्या यांनी कार्यकर्त्यांना केले.

महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीम यांच्या विरोधात दोन भ्रष्टाचाराचे आरोप मी केले आहेत. मला अटक करून गणेश विसर्जनाला जाऊ दिले नाही. कोल्हापुरात जाऊन मला अंबामातेचे दर्शन घ्यायचे होते. तेथे जाऊ दिले नाही. या हसन मुश्रीफांविरोधात मी २८ सप्टेंबरला पोलिसांकडे तक्रार नोंदवणार असून मुश्रीफ यांना चांगलाच धडा शिकवणार आहे, असे सोमय्या म्हणाले.

ठाकरे व वायकर यांनी अन्वय नाईक यांच्याकडून मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील जमीन खरेदी केली. या जमीन खरेदी व्यवहारात १९ बंगले दाखविण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर व ॲड. महेश मोहिते यांना घेऊन मी त्या जागेची पाहणी केली. तेव्हा ज्या जमीन व्यवहार खरेदीत या जमिनीवर १९ बंगले दाखविण्यात आले होते ते गायब आहेत असे दिसले. ते शोधण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ते सापडले की रवींद्र वायकर यांना दाखवू. ज्यांचे हरवलेले बंगले शोधून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत तेच आमच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करीत आहेत हे अनाकलनीय आहे. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी रात्री लपत जाऊन ईडीच्या कार्यालयात ५३ लाख रुपये भरलेत. म्हणजेच ते भ्रष्टाचारानेच कमवलेले होते. अशा भ्रष्टाचारी संजय राऊतांनी आम्हाला शिकवू नये, असे सोमय्या यांनी सांगितले.

महाविकास आघाडीत सर्व पक्ष आमचे शत्रू आहेत. त्यांचा भ्रष्टाचार शोधून काढून तो चव्हाट्यावर आणणार. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करणार. कोर्लई येथील जमीन खरेदी व्यवहार प्रकरणाच्या लढाईत आम्ही किरीट सोमय्या यांच्यासोबत राहणार, असे ॲड. महेश मोहिते या वेळी म्हणाले. उपस्थितांचे स्वागत परशुराम म्हात्रे यांनी व सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले, तर ॲड. अंकित बंगेरा यांनी आभार मानले.

# उरणमधील भाजपच्या रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

कोविड-१९ या वैश्विक महामारीशी लढताना रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत भारतीय जनता पक्ष व युवा मोर्चा उरण तालुकाच्या वतीने शहरातील तेरापंथी सभागृहात रविवारी (दि. २६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकूण १११ जणांनी रक्तदान केले.

उरण तालुका भारतीय जनता पक्ष व युवा मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने व डॉ. डी. वाय. पाटील ब्लड बँकेच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकी जपत हे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, अल्पसंख्याक मोर्चा कोकण विभाग प्रमुख शहानवाज मुकादम, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, शहराध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, चिटणीस चंद्रकांत घरत, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष जसीम इस्माईल गॅस, तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, मुकुंद गावंड, दीपक भोईर, सरचिटणीस सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष शेखर पाटील, महिला मोर्चा शहराध्यक्ष संपूर्णा थळी, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, नगरसेवक नंदू लांबे, राजेश ठाकूर, नगरसेविका जान्हवी पंडित, आशा शेलार, स्नेहल कासारे, व्यापारी सेलचे संयोजक हितेश शाह, अजित भिंडे, मनोहर सहातिया, हस्तीमल मेहता, कुणाल शिसोदिया, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, युवा कार्यकर्ते कल्पेश म्हात्रे, सुरज ठवले, अविनाश भोईर, प्रीतम पाटील, विशाल पाटेकर, प्रमोद म्हात्रे, परशुराम म्हात्रे, लायन्स क्लबचे अध्यक्ष सदानंद गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते रोहित पाटील, प्रसाद मांडेलकर, बाबुलाल सांखला आदी उपस्थित होते.




या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

## निवडक

### अमेरिकेने १५७ पुरातन वस्तू पंतप्रधान मोदींकडे सोपवल्या

**न्यूयॉर्क** : संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेसाठी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन, उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांची भेट घेतली. त्यासोबतच संयुक्त राष्ट्रांच्या महासभेसमोर पंतप्रधानांनी भाषण केले. या दौऱ्यात अमेरिकेने तब्बल १५७ दुर्मिळ ऐतिहासिक भारतीय कलात्मक वस्तू पंतप्रधानांकडे सोपवल्या आहेत. यामध्ये शेकडो वर्ष जुन्या मूर्तींचाही समावेश आहे.

### दोन दहशतवाद्यांचा खात्मा; शस्त्रे, स्फोटके हस्तगत


**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील बांदीपुरा जिल्ह्यात रविवारी (दि. २६) झालेल्या चकमकीत दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात जवानांना यश आले. या दोनपैकी एका दहशतवाद्याचा भाजप नेते वसीम बारी, त्यांचे वडील व भावाच्या हत्येत सहभाग होता. चकमक झालेल्या ठिकाणाहून शस्त्र, स्फोटकांसह अन्य साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

# अजितदादा, आमच्या लोकांना नाराज करू नका, नाहीतर गडबड होईल!

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असले, तरी सत्तेतील तिन्ही पक्षांमध्ये वारंवार विसंवाद दिसून येत आहे. त्याचाच प्रत्यय रविवारी (दि. २६) पुन्हा एकदा आला. शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी पुण्यातील भोसरी येथे शिवसेनेच्या एका कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून अजितदादा, आमचे ऐका, नाहीतर गडबड होईल, असा इशारा दिला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे. त्यामुळे या ठिकाणी संजय राऊतांनी केलेल्या विधानाचे राजकीय अर्थ काढले जात आहेत. पालकमंत्री आपले नाहीत. राज्यात जरी सत्ता असली, तरी या भागात आपले कुणी ऐकत नाही असे म्हणतात, पण असे होता कामा नये.



### शिवसेना नेते संजय राऊतांचा इशारा

महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री शिवसेनेचा आहे. अजित पवारदेखील उपमुख्यमंत्री आहेत. ते मुख्यमंत्र्यांचे ऐकतात. आपण त्यांना सांगू, दादा ऐकले तर बरे होईल. नाही तर मुख्यमंत्री दिल्लीला गेले आहेत आज, अशी टिप्पणी राऊत यांनी या वेळी केली.

आघाडी होईल का, नाही झाली तर काय? त्या भानगडीत कशाला पडायचे आपण? आपल्याला एकट्याने लढण्याची सवय आहे. आलात तर तुमच्याबरोबर, नाही तर तुमच्याशिवाय. कशाकरिता आपण रेंगाळत बसायचे. आपण सगळ्या जागांची तयारी केली पाहिजे. उद्या आपल्यासमोर चर्चेला बसतील. मग या घ्या, त्या घ्या. आपण सन्मानाने आघाडी करण्याचा प्रयत्न करू, पण स्वाभिमान सोडून भगव्या झेंड्याशी तडजोड आपण करणार नाही हे लक्षात घ्या. एकदा ठरले लढायचे म्हटल्यावर आपण लढू, असेदेखील राऊत यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांना सांगितले.

दरम्यान, या वेळी संजय राऊत यांनी अप्रत्यक्षपणेही अजित पवारांना टोला लगावला. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री शिवसेनेचा आहे. कुणाची भीती बाळगायचे कारण नाही. तुम्ही जबाबदारी घ्या, काही झाले तर मला सांगा. मी येतो इथे, असे राऊत म्हणाले.



# मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धा

**पनवेल** : अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेची अंतिम फेरी रविवारी मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात रंगली. अंतिम फेरीचे उद्घाटन महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध सिनेनाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अभिनेते प्रभाकर मोरे, भरत साळवे, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष तथा महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)






# भायखळा तुरुंगातील ३९ जणांना कोरोनाची लागण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट होताना दिसत आहे, मात्र मुंबईतील भायखळा तुरुंगातील ३९ जणांना कोरोनाची लागण झाल्याची माहिती समोर आली आहे. कारागृहात एकाच वेळी ३९ जण कोरोनाबाधित आढळल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेने हा परिसर सील केला आहे.

भायखळ्यातील महिलांसाठी असलेल्या तुरुंगात गेल्या १० दिवसांत सहा मुलांसह ३९ जणांची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली आहे. यापैकी ३६ जणांना माझगाव परिसरातील पाटणवाला नगरपालिका शाळेत क्वारंटाइन करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत, तर वरिष्ठ नागरिकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या कैद्यांमध्ये एका गर्भवती महिलेचाही समावेश असल्याने तिला खबरदारीचा उपाय म्हणून जीटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. संपर्कात आलेल्या अन्य कैद्यांची चाचणी होणार आहे.


## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

### पनवेल महानगरपालिका हद्दीत सोमवार, दि. २७ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. तळोजा शाळा, तळोजा गाव
१२. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१५. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
१६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
१८. सुधागड कॉलेज, कळंबोली
१९. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
२०. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे
२१. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोव्हॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

### पनवेल ग्रामीण लसीकरण

१. पडघे, रा.जि.प. शाळा
२. खिडूकपाडा, रा.जि.प. शाळा
३. खारघर गाव, रा.जि.प. शाळा
४. काळुंद्रे, रा.जि.प. शाळा
५. घोट, रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा, गोंधळी पाडा, मढवी पाडा, वाघाची वाडी)
६. खुटारी, एकटपाडा, रा.जि.प. शाळा
७. धरणा रा.जि.प. शाळा


**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता १०० व दुसऱ्या डोसकरिता ५० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी. (वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)**

# ‘व्होकल फॉर लोकल’मध्ये विक्रम करूया

## पंतप्रधान मोदींचे ‘मन की बात’मधून देशवासीयांना आवाहन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ‘मन की बात’च्या माध्यमातून दर महिन्याला देशवासीयांशी संवाद साधतात. पुढील आठवड्यात येणाऱ्या गांधी जयंतीनिमित्ताने नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आवाहन केले आहे. या दिवशी व्होकल फॉर लोकल या अभियानाचे आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडीत काढू, असे आवाहन मोदींनी देशवासीयांना केले. हा विक्रम खादीसंदर्भातला आहे. यासाठी आगामी दिवाळीच्या मुहूर्ताचादेखील पंतप्रधानांनी आपल्या संवादात उल्लेख केला.



२ ऑक्टोबर हा दिवस देशभरात गांधी जयंती म्हणून साजरा केला जातो, मात्र या दिवशी देशवासीयांनी एक अनोखा विक्रम प्रस्थापित करावा, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. गेल्या काही वर्षांत देशात खादी आणि हँडलूमचे उत्पादन अनेक पटींनी वाढले आहे. दिल्लीच्या खादी शोरूममध्ये अनेकदा एका दिवसात एक कोटीहून जास्त रुपयांचा व्यवहार झालाय. आता येत्या २ ऑक्टोबरला बापूजींच्या जयंतीच्या दिवशी आपण पुन्हा एकदा नवा विक्रम करूयात.

तुम्ही तुमच्या शहरांमध्ये जिथे कुठे खादी, हँडलूम, हँडिक्राफ्टची विक्री होत असेल, तिथून तुमची खरेदी करा. दिवाळीचा उत्सवदेखील येऊ घातला आहे. त्यामुळे आपली सर्व खरेदी अशा ठिकाणाहून करून व्होकल फॉर लोकल या अभियानाचे आत्तापर्यंतचे सगळे रेकॉर्ड आपण मोडुयात, असे आवाहन पंतप्रधानांनी या वेळी केले.

### जागतिक नदी दिनानिमित्त दिला संदेश

दरम्यान, जागतिक नदी दिनाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी या वेळी देशवासीयांना जल प्रदूषणाविषयी संदेश दिला. कुणीही विचारेल, की तुम्ही नद्यांची एवढी गाणी गाता, नदीला आई म्हणता, तर ही नदी प्रदूषित का होत आहे. आपल्या शास्त्रांमध्ये नद्यांमध्ये थोडे जरी प्रदूषण झाले, तरी ते चुकीचे सांगितले आहे. आपली परंपरा देखील तीच राहिली आहे, असे मोदी या वेळी म्हणाले.

मला वेळोवेळी लोकांनी भेट म्हणून दिलेल्या वस्तूंचा ई-लिलाव होत आहे. त्यातला पैसा नमामि गंगेसाठी दिला जातो. देशभरात नद्यांना पुनर्जीवित करण्यासाठी, पाण्याच्या स्वच्छतेसाठी अनेक स्वयंसेवी संघटना, सरकार निरंतर काहीतरी करत असतात. हीच परंपरा, आस्था आपल्या नद्यांना वाचवून ठेवतेय. अशा लोकांबद्दल माझ्या मनात आदराची भावना असते, असेही मोदींनी यावेळी नमूद केले.

# पनवेलमधील टपाल नाका ते उरण नाका एक दिशा मार्ग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील वाहतूक कोंडीसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेत नुकतीच पोलीस अधिकारी, महापालिका अधिकारी, नगरसेवक आणि व्यापारी यांची बैठक घेतली. या वेळी सूचविण्यात आलेले उपाय प्रायोगिक तत्त्वावर काही दिवस राबविण्याचे ठरले. त्यानुसार टपाल नाका ते उरण नाका हा मार्ग सोमवार (दि. २७) पासून एक दिशा मार्ग राहील. उरण नाक्याकडून टपाल नाक्याकडे येणाऱ्या सर्व वाहनांना (दुचाकी वाहने वगळून) प्रवेश बंद करण्याबाबतची कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

जनतेच्या सोयीसाठी शहरातील वाहतूक व्यवस्थेत सुसुत्रता आणण्यासाठी शहरातील वाहतूक व्यवस्थेमध्ये बदल करणे आवश्यक आहे. दिनांक ४ ऑक्टोबर २००३ अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार पनवेलमधील वाहतुकीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी पनवेल वाहतुक शाखेच्या हद्दीतील टपाल नाका ते उरण नाका हा मार्ग एक दिशा मार्ग राहील व उरण नाक्याकडून टपाल नाक्याकडे येणाऱ्या सर्व वाहनांना (दुचाकी वाहने वगळून) प्रवेश बंद करण्याबाबतची कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

पंचरत्न चौक ते टपाल नाका (मोमीनपाडा मशीद मार्गे) या रस्त्यावर वाहनांची सम-विषम पार्किंगचीदेखील कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे.



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोहो गावात गौरा गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, तसेच प्रमोद भिंगारकर, राजेश पाटील, चाहू म्हात्रे, प्रमोद म्हात्रे, चेतन मोरे, ह.भ.प. प्रवीण म्हात्रे, भाजप कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.**

# भाजपची खारघरमध्ये स्वच्छता मोहीम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अभियानांतर्गत भाजप दक्षिण भारतीय सेल खारघर मंडल कार्यकर्त्यांच्या सहभागातून खारघर येथील सेक्टर ६च्या गोल्फ कोर्सजवळील परिसर कचरा गोळा करून स्वच्छ करण्यात आला.

या कार्यक्रमानिमित्त सेवा देताना खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, दक्षिण भारतीय सेल संयोजक रोहन शेट्टी, पर्यावरण कार्यक्रम प्रमुख योगिंद्रम कोट्टारी, प्रसिद्धी प्रमुख प्रभाकर बांगर, प्रदीप शेलार, अमरनाथ, पवित्रा कोट्टारी, सानवी कोट्टारी, जगन्नाथ पुजारी, माया चव्हाण, शमा राव, चित्रा राव, प्रभाकर चिदुराला, एन. सेंथिल मुरुगन, वनिया पेरुमाल, चेल्लाप्पा दास, प्रतिक सालियान व रहिवासी उपस्थित होते.



# महात्मा फुले महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा ऑनलाइन मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नुकताच माजी विद्यार्थी मेळावा झाला. ऑनलाइन पद्धतीने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या २७०हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्याला आपली उपस्थिती दर्शविली.

प्रास्ताविकात ग्रामीण विकास विभाग प्रमुख डॉ. रमेश म्हात्रे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले. प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी महाविद्यालयासाठी माजी विद्यार्थी मंडळाने दिलेल्या आतापर्यंतच्या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले. यापुढेही असेच सहकार्य माजी विद्यार्थ्यांकडून मिळेल, अशी




आशाही त्यांनी व्यक्त केली. या वेळी महाविद्यालयाच्या घोडदौडीचा आढावाही त्यांनी घेतला.

या मेळाव्यात पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रातला उच्चांक गाठलेला पाहून अत्यानंद होत असल्याची भावना व्यक्त केली. मेळाव्यात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष महेंद्र घरत, अतुल पाटील, अरुण कुंभार, डॉ. शैलेश वाजेकर, उल्का धुरी, साधना घरत, सूर्यकांत ठाकूर, प्रशांत देशमुख अशा अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सुरुवातीस ‘रयत’चे उपाध्यक्ष गणपतराव देशमुख, जनरल बॉडी सदस्य लक्ष्मणशेठ पाटील, दशरथशेठ ठाकूर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या समारंभाला माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष बाळाराम पाटील, विजय लोखंडे, प्रीतम म्हात्रे, प्रा. डॉ. सुनील पाटील, मिलिंद पाडगावकर, सुरेश पाटील, राजू मुंबईकर, योगेश पाटील, डॉ. शैलेश वाजेकर आदी माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. पराग पाटील यांनी मानले.

# कामोठ्यातील शिबिरात हाडांची मोफत तपासणी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथे सेक्टर ३५ मधील पुरातन श्री गणेश मंदिर येथे रविवारी (दि. २६) हाडांची मोफत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.



साधारणतः वयाच्या ३५, ४० वर्षानंतर शरीरातील हाडातील कॅल्शियमचे प्रमाण कमी होऊ लागते विशेष करून स्त्रियांमध्ये हाडांची डेन्सिटी कमी होण्याची समस्या उद्‌भवण्याचे प्रमाण जास्त आहे. वेळीच हाडांची ठिसूळता लक्षात आली नाही तर पुढे गंभीर समस्या निर्माण होऊ शकते हे लक्षात घेऊन नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, श्री पुरातन गणेश मंदिराचे अध्यक्ष प्रकाश पाटील, नगरसेविका कुसुम रवींद्र म्हात्रे, कामोठे येथील प्रभाग १२चे अध्यक्ष रमेश चंद्रकांत म्हात्रे यांनी हे शिबिर आयोजित केले होते.

साधारणतः १२०० रुपये मूल्य असलेली तपासणी मोफत करण्यात येत असल्यामुळे या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. डॉ. मीनाक्षी वीरकर, आनंदा डिगे, प्रशांत क्षीरसागर, पल्लवी वाळके, पूर्णिमा गवारे यांच्या पथकाने हाडांची तपासणी केली.

या शिबिराला कामोठे शहर भाजप अध्यक्ष रवींद्र जोशी, ॲड. धनराज तोकडे यांनी आवर्जून उपस्थित राहून शिबिराला शुभेच्छा दिल्या. शिबिराच्या यशस्वितेसाठी अतुल गोवारी, हरीश गोवारी, युवराज पाटील यांनी विशेष मेहनत घेतली. सकाळी ९ ते दुपारी ३पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा ७५ रहिवाशांनी लाभ घेतला.

# सेवा समर्पण अभियानांतर्गत पनवेलमध्ये आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सेवा व समर्पण अभियानांतर्गत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग २०मध्ये रविवारी (दि. २६) नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले.



आधार मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटल व नायर सुपरस्पेशालिटी आय हॉस्पिटल यांच्या माध्यमातून सर्व नागरिकांसाठी या मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी उपमहापौर तथा नगरसेविका चारुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, शहर महिला अध्यक्ष वर्षा नाईक, वैद्यकीय सेल अध्यक्ष ज्योती देशमाने, जयराम मुंबईकर, किशोर मोरे आदी उपस्थित होते.

# नवघर येथे कोविड लसीकरणाचा ३५० नागरिकांनी घेतला लाभ

**उरण : वार्ताहर**


उरण तालुक्यातील नवघर येथे एपीएम टर्मिनल कंपनी (ॲनेक्स सीएसएफएपी) व पालवी हॉस्पीटल यांच्या सहकार्याने व भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हा सरचिटणीस शेखर तांडेल यांच्या माध्यमातून कोविड प्रतिबंधक लसीकरण ठेवण्यात आले होते.



शेखर तांडेल यांच्या कार्यालयात झालेल्या लसीकरण शिबिरात पहिल्या व दुसऱ्या कोविशिल्ड लसीच्या डोसचा ३५० नागरिकांनी लाभ घेतला. या शिबिरात एपीएम टर्मिनल कंपनीचे मॅनेजमेंट व पालवी हॉस्पीटल उरणचे डॉ. सुरेश पाटील आणि त्यांची टीम, तसेच नवघर गावातील एपीएम टर्मिनलचे कर्मचारी राजेश पाटील, जयप्रकाश पाटील, धर्मेंद्र तांडेल, प्रितम बंडा, विनोद बंडा, दिनेश बंडा, चंद्रलाल तांडेल, वैभव भोईर, अमित जोशी, हार्दिक भोईर, रोशन भोईर, अनिल पाटील, धर्मेंद्र पाटील, प्रतिमा पाटील आदी तरुणांनी योग्यप्रकारे नियोजन करून नागरिकांना डोस देण्यास सहकार्य केले.

# यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्रातून शंभराहून अधिक उमेदवार यशस्वी

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशातील एकूण ७६१ उमेदवारांपैकी महाराष्ट्रातील १००हून अधिक उमेदवारांनी यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्यातून मृणाली जोशी यांनी प्रथम, तर विनायक नरवाडे यांनी दुसरा क्रमांक मिळवला आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२० सालातील परीक्षेचा अंतिम निकाल शनिवारी जाहीर झाला. यात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील पाच उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये मृणाली जोशी (३६), विनायक कारभारी नरवाडे (३७), रजत रवींद्र उभयकर (४९), जयंत नाहाटा (५६), धीनह दस्तरगीर विनायक महामुनी (९५) अशा क्रमांकावर हे उमेदवार आहेत.




# ट्रकच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**पनवेल :** कळंबोली -मुंब्रा रोडवर खिडुकपाडा गाव येथे एका ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत आठ वर्षांची मुलगी आणि ४० वर्षांच्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरुण भगवान गायकवाड व रिया जाधव अशी मृतांची नावे आहेत. गायकवाड हे रियाला भिवंडी येथे तिच्या घरी सोडण्यासाठी मोटरसायकलवरून निघाले होते. त्यांच्या दुचाकीला ट्रकने धडक दिली.



**रसायनी : भाजप गुळसुंदे जि. प. विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवाजी माळी, झोपडपट्टी सेलचे तालुकाध्यक्ष महादेव कांबळे यांनी आकुलवाडी येथे गौरा गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी युवा मोर्चा तालुका चिटणीस रमेश मालुसरे, पोलीस पाटील व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत पनवेल व कळंबोलीत शिबिर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील कापड बाजारच्या गणपती मंदिर येथील जय भवानी मित्र मंडळाच्या वतीने गौरा गणेशोत्सवानिमित्त शुक्रवारी (दि. २४) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन रक्तदात्यांना प्रोत्साहित केले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका चारुशीला घरत, भाजप पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक नितीन पाटील, हरेश केणी, अजय बहिरा, माजी नगरसेविका नीता माळी, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक स्मिता जाधव, तळोजा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक राजेंद्र जाधव, मंडळाचे अध्यक्ष अमित माळी, उपाध्यक्ष संजय रौंधळ, खजिनदार सुरज गेहलोत, सचिव राकेश भगत, कार्याध्यक्ष अक्षय माळी, संघटक प्रवीण जाधव, तसेच निलेश पाटील, चंद्रकांत मंजुळे, चित्रा वाघ, रिमा रावल, रेखा भगत आदी उपस्थित होते.

दरम्यान, खास महिलांसाठी थायरॉईड चेकअप कॅम्पही आयोजित करण्यात आला होता. शिबिरामध्ये डॉक्टर्स व कोरोना योद्ध्यांचा सन्मान करण्यात आला.

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

सेवा व समर्पण अभियान अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने कळंबोलीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या वेळी नगरसेवक राजेंद्र शर्मा, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अमर ठाकूर, शहर अध्यक्ष गोविंद झा, शहर चिटणीस महेश बारगजे, भाजप भटके-विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष बबन बारगजे, महिला आघाडी शहर अध्यक्ष मनीषा निकम, मयूरी पेरवी, नीता धर्माधिकारी, बबलू शेख आदी उपस्थित होते.



# व्यापारी, दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप

## भाजपच्या संदीप पाटील यांचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणपूरक निर्णय घेऊन प्लास्टिक पिशव्यांना विरोध करून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्या वतीने प्रभाग क्रमांक १७मधील मंगलमूर्ती फेरीवाला मार्केट येथे व्यापारी व दुकानदारांना कापडी पिशव्या वाटप करण्यात आल्या.

या वेळी भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती सुशीला घरत नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका चारुशीला घरत, यांच्या हस्ते व्यापारी वर्गास पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास तुषार भगत, प्रमोद म्हामुणकर, रणजित येरुणकर, विजय म्हात्रे आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.







**भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांना वाढदिवसानिमित्त जिल्हा चिटणीस तथा नगरसेविका चारुशीला घरत, उपाध्यक्ष संध्या शारबिंद्रे यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी सरचिटणीस मृणाल खेडकर, जि. प. सदस्य अनिता शहा, सुरेखा गांधी, स्नेहल सावंत, खोपोली मंडल अध्यक्ष शोभा काटे, कर्जत मंडल अध्यक्ष सुगंधा भोसले, कर्जत शहर अध्यक्ष सरस्वती चौधरी आदी उपस्थित होते.**

# नवीन पनवेलमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलच्या प्रभाग २०मधील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात शनिवारी (दि. २५) पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

भाजपच्या प्रभाग २०च्या कार्यालायात असलेल्या मंदार वाचनालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला माजी उपमहापौर तथा नगरसेविका चारुशीला घरत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी जयराम मुंबईकर, किशोर मोरे, जयेश ठाकूर, कमलाकर घरत, दिनेश सुर्वे, वैशाली पाटील, प्रभा सिन्हा, दीपा भुकम, ज्योती पवार, समीर मोरे, मीनाक्षी आदी उपस्थित होते.



# नगरसेवक विक्रांत पाटील यांच्यातर्फे जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा

**पनवेल : वार्ताहर**

वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घटक असूनसुद्धा डॉक्टरांच्या तुलनेत कमी कौतुक मिळालेला घटक म्हणजे फार्मासिस्ट. सरकारी अथवा खाजगी मेडिकल स्टोरमधील फार्मासिस्ट हा नेहमी कौतुकापासून दूर राहिला. त्याच्या सेवेला म्हणवे तेवढे महत्त्व समाजाकडून मिळाले नाही आणि म्हणूनच जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त नगरसेवक तथा भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या वतीने फार्मासिस्टचा सन्मान करण्यात आला.



२५ सप्टेंबर या जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त प्रभागातील खाजगी मेडिकल स्टोर, तसेच उपजिल्हा रुग्णालय आणि महापालिकेच्या सेवेत कार्यरत असलेल्या सर्व फार्मासिस्ट यांचा सन्मान करण्यात आला. फार्मासिस्ट कार्यरत असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नगरसेवक विक्रांत पाटील हे नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असतात आणि जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त त्यांच्या वतीने फार्मासिस्ट यांचा सन्मान करण्यात आला. त्याबद्दल सर्व फार्मासिस्टने नगरसेवक विक्रांत पाटील यांचे आभार मानले.

कोरोना काळात डॉक्टरांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून फार्मासिस्टने सुद्धा जनतेची सेवा केली आहे. अशा आपल्या फार्मासिस्ट मित्र-मैत्रिणींचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याबद्दल नगरसेवक विक्रांत पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. या वेळी निलेश वाडेकर, रोहन वाजेकर, सचिन कुलकर्णी, दुर्वांक कामेरकर, संकेत शेटे, सनी सोनवणे, वसुधा सोलंकी, स्वाती पवार, गीता शाह आणि हर्षा ठक्कर आदी उपस्थित होते.

# पनवेल पत्रकार मंचतर्फे फार्मासिस्टचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त फार्मासिस्ट मंडळींचे रुग्णसेवेच्या कार्याप्रति आभार प्रकट करण्याच्या उद्देशाने पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने पनवेलमधील फार्मासिस्ट बांधवांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पनवेल नगरीच्या जडणघडण प्रक्रियेचे साक्षीदार असणाऱ्या यशवंत मेडिकल, माधव मेडिकल, धन्वंतरी मेडिकल आणि प्रीती मेडिकल यांना गौरविण्यात आले.



पत्रकार मंचाचे अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी शाल पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन फार्मासिस्ट बांधवांचा सत्कार केला.

सन्मान सोहळ्याला मंचचे सरचिटणीस मंदार दोंदे, विवेक पाटील, संजय कदम, खजिनदार नितीन कोळी, राजू गाडे, सचिन वायदंडे, सुनील राठोड, चेतन पोपेटा, वैभव लबडे आदी उपस्थित होते.

# गौरा गणपती दर्शन





**पनवेल : भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी ठिकठिकाणी जाऊन गौरा गणपतीचे दर्शन घेतले.**



**ग्रामस्थ मंडळ कोंडले, पनवेल**



**उरण : भारतीय जनता पक्षाच्या पंचायत समिती सदस्य दिशा प्रसाद पाटील यांच्या घरी विराजमान अडीच दिवसाचा गौरा गणपती. सोबत जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका सरचिटणीस प्रसाद पाटील, प्रवीण पाटील, दयानंद म्हात्रे.**



**पनवेल : सुकापूर येथील एकता मित्र मंडळाच्या गौरा गणपतीचे भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे आणि शहर सरचिटणीस अमरिश मोकल यांनी दर्शन घेतले. या वेळी मंडळाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.**



**कामोठे : भाजपचे के. के. म्हात्रे यांच्या घरचा गौरा गणपती.**



**पनवेल : भाजपचे युवा नेते केदार भगत यांनी गावदेवी मित्र मंडळ (गावदेवी पाडा), शिवशक्ती मित्र मंडळ (लाईन आळी), जय भवानी मित्र मंडळ (कापड बाजार), सदिच्छा मित्र मंडळ (घाटे आळी), निखिल जाधव यांच्या घरातील बाप्पा अशा विविध गौरा गणपतीचे दर्शन घेतले. सोबत अभिजित साखरे, सुमित दसवते, नितेश भगत, योगेश साळवी, गौरव सावंत, साहिल मोरे, कपिल कुरघोडे, सनी गायकर, सनी भेंडखळे, सिद्धू मोरे, आकाश भोपतराव आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# दहशतवादाला थारा नाही!


अवघे विश्व गेल्या दीड वर्षापासून कोरोना महामारीशी झुंजत आहे. कोविड-१९ विषाणूने प्रचंड उलथापालथ केली. कोरोनारूपी आपत्ती अचानक आलेली आहे, पण दहशतवादाची समस्या गेल्या अनेक वर्षांपासून जगाला भेडसावत आहे. तिचा मुकाबला करण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येणे काळाची गरज आहे.

**अफगाणिस्तावर तालिबानी दहशतवाद्यांनी ताबा मिळविलेला असून तेथे आता तालिबानी राजवट आहे. तालिबानी हे क्रूरतेसाठी ओळखले जातात. त्यांनी आपले हातपाय इतरत्र पसरू नये यासाठी वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पाकिस्तानी दहशतवादाला वेळोवेळी ठेचणे जरूरीचे आहे. कारण हेच दोन-तीन देश दहशतवाद्यांना पोसत असून त्याचा त्रास संपूर्ण जगाला भोगावा लागत आहे, ज्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत बोलताना खरपूस समाचार घेतला. काही देश त्यांनाही दहशतवादाचा मोठा धोका आहे हे माहीत असूनही दहशतवादाचा वापर राजकीय साधन म्हणून करीत आहेत, असा अंगुलीनिर्देश करीत पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानवर नाव न घेता टीका केली. पाकिस्तानची भूमी ही दहशतवाद्यांसाठी पोषक मानली जाते. अनेक कुप्रवृत्ती तेथे आश्रयाला असल्याची अनेक उदाहरणे आहेत. अमेरिकेवर हल्ला करणारा ओसाबा बिन लादेन, भारतात बॉम्बस्फोट घडविणारा डॉन दाऊद इब्राहिम यांना पाकिस्तानने आपल्याकडे आश्रय दिला. हे दहशतवादाला खतपाणी घालण्यासारखेच नव्हे तर काय? भारताचे सक्षम नेतृत्व असलेल्या पंतप्रधान मोदींनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत याचा उल्लेख केला नसता तरच नवल. अफगाणिस्तानातील परिस्थितीवरही त्यांनी भाष्य केले. अफगाणिस्तानमधील महिला आणि अल्पसंख्याकांना मदतीची आवश्यकता आहे. त्यांना मदत करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. तेथील परिस्थितीचा वापर कोणताही देश आपल्या राजकीय स्वार्थासाठी करणार नाही, याबद्दलही आपल्याला सतर्क राहावे लागेल, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत हिंदीत केलेल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी लोकशाही मूल्ये, कोरोनानंतरची जागतिक अर्थव्यवस्था, भारताची प्रगती अशा अनेक गोष्टींवरही प्रकाश टाकला. पंतप्रधान मोदींबरोबरच भारताच्या प्रथम सचिव स्नेहा दुबे यांनीही दहशतवादाबाबत पाकिस्तानचे कान टोचले. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी उपस्थित केलेल्या काश्मीरच्या मुद्द्यावर बोलताना दुबे यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले. पाकिस्तान प्रत्यक्षात शांततेचा पुरस्कर्ता असल्याचा आव आणत असला, तरी तो आग लावणारा देश आहे, पाकिस्तानात दहशतवाद्यांना खुलेआम आश्रय मिळतो, अशा शब्दांत त्यांनी पाकिस्तानचा ढोंगी बुरखा फाडला. भारताने काश्मीरला विशेष दर्जा देणारा संविधानातील कलम ३७० रद्द केल्याबद्दल पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान यांनी टीका करताना पाकिस्तानवादी नेते सय्यद अली शहा गिलानी यांच्या मृत्यूचा उल्लेख केला होता. त्याला उत्तर देताना दुबे यांनी, जम्मू-काश्मीर आणि लडाख हे भारताचे अविभाज्य भाग असून त्यात पाकिस्तानने बेकायदा कब्जा केलेल्या काही भागांचाही समावेश आहे. पाकिस्तानने त्या भागांवरचा ताबा सोडावा, असे सुनावले. एकूणच संयुक्त राष्ट्रसंघाची परिषद दहशतवादाच्या विषयाने गाजली. त्यात भारताने सूचविलेल्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केल्यास संपूर्ण विश्वात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होईल.**

# विकासासाठी हवे सर्वसमावेशक कोकण पर्यटन!

कोरोना विषाणू प्रादूर्भावाच्या संकटकाळात यंदा (२७ सप्टेंबर) दुसरा जागतिक पर्यटन दिन साजरा होतो आहे. गेल्या वर्षी कोकणच काय अख्खं जागतिक पर्यटन, 'वेट अ‍ॅन्ड वॉच'वर थांबलं होतं. अपवाद वगळता आजही यात मोठा फरक पडलेला नाही. सन २०५०पर्यंत जगातील ६८ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्यास असेल असं तज्ज्ञांचं मत आहे. त्यामुळे कोरोनोत्तर काळात 'ग्रामीण डेस्टीनेशन्स'ना मोठ्या संधी उपलब्ध होण्याचे संकेत आहेत. युनायटेड नेशन्स वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशनची यंदाच्या पर्यटन दिनाची मध्यवर्ती संकल्पना सर्वसमावेशक वाढीसाठी पर्यटन अशी आहे. 'कोरोनोत्तर काळात 'ग्रामीण डेस्टीनेशन्स'ना मोठ्या संधींचा कोकण संदर्भात विचार करताना आपल्याला विकासासाठी हव्या असलेल्या सर्वसमावेशक कोकण पर्यटनाचा विचार करावा लागेल.

लोकांपर्यंत पर्यटनाचे महत्त्व पोहचवणे, विविध पर्यटन स्थळांच्या सांस्कृतिक, सामाजिक, ऐतिहासिक मूल्यांच्या माहितीचे आदानप्रदान करणे यासाठी १९८० सालापासून आपल्याकडे पर्यटन दिन साजरा होतो आहे. अलिकडे आपल्या देशाने जबाबदार प्रवासी बनविण्याचे लक्ष ठेवले असून त्या पार्श्वभूमीवर इको टुरिझम सोसायटी ऑफ इंडियाचे रिस्पॉन्सिबल टुरिझम सोसायटी ऑफ इंडिया असे नामकरण करण्यात आले आहे. ग्रामीण पर्यटनातील संभाव्य संधींचा विचार करता कोकणसह महाराष्ट्रासाठी कोरोनोत्तर काळ सुवर्णकाळ ठरू शकणार आहे. परदेशी पर्यटनात सर्वांत जास्त सहभाग हा ६०पेक्षा अधिक वय असलेल्यांचा असतो. कोरोनाने त्यांचा आत्मविश्वास कमी केला आहे. देशांतर्गतही अधिक दिवस फिरणारे लोकं तीन-चार दिवसांच्या पर्यायांचा विचार करतील, असा अंदाज आहे. कोकणसाठी राज्य सरकारने नुकतीच ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या मुंबई-सिंधुदुर्ग ह्या ४०० किमीच्या ग्रीन फील्ड कोकण द्रुतगती मार्ग (एक्स्प्रेस वे) प्रकल्प घोषणा केली. याद्वारे वरळी (मुंबई) उन्नत मार्गावरून साडेतीन तासात मनुष्य सिंधुदुर्गला पोहोचेल अशी संकल्पना आहे. या प्रकल्पाचा आराखडा (डीपीआर) आणि सर्वेक्षण काम सुरू झाले असताना वकील ओवेस पेचकर यांनी हा प्रश्न उच्च न्यायालयात उपस्थित केल्यानंतर 'मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरण प्रकल्प पूर्ण करत नाही, तोवर आम्ही तुम्हाला दुसरा प्रकल्प सुरू करू देणार नाही,' असं उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला सुनावले आहे. पर्यटकांची वर्तमान मानसिकता पुरेसी कॅश करण्यासाठी कोकणचं कोकणीपण टिकायला हवं आहे. असं असताना कोकणात 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट'च्या नावाखाली गेली अनेक वर्षे काय सुरू आहे ? याची जाणीव आम्हाला जुलै महिन्यातील अतिवृष्टीने करून दिली आहे.





एकीकडे सरकारचे पर्यटन धोरण हे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल असेच असायला हवे, तर दुसरीकडे आपली संस्कृती 'अतिथी देवो भव' म्हणत असल्याने आम्ही स्थानिकांनी येणाऱ्या पर्यटकाला अवाच्या सव्वा किमती सांगून भांबावून सोडणे थांबवायला हवे. यासाठी यंत्रणा कार्यरत व्हायला हव्यात. आरोग्य पर्यटनसारख्या विषयात केरळ, तमिळनाडू ही राज्ये आघाडीवर आहेत. नैसर्गिक संधी असताना आपण कधी यात पुढाकार घेणार? यासाठी शासन धोरण काय आहे? भारतातील अनेक नामांकित पर्यटन कंपन्यांच्या टूरलिस्टमध्ये आजही कोकण दिसत नाही. अपवादात्मक काही कंपन्यांच्या लिस्टमध्ये तारकर्ली (स्नॉर्केलिंग) आणि गणपतीपुळे दिसू लागलंय. यातल्या तारकर्लीला २०११ साली आदरातिथ्यात देशात पहिला क्रमांक मिळाला होता. २०१५ साली तारकर्लीचा देशातील सर्वोत्कृष्ट सागरी किनारा म्हणून सन्मान झाला होता. असं असलं तरी तारकर्लीतील पर्यटन व्यवसाय हंगाम सहा ते आठ महिन्यांचा आहे. याकडे आम्ही कसे पाहातो? हे फार महत्त्वाचे आहे. कोकणात ठिकठिकाणी पर्यटन संस्था आणि संघ कार्यरत आहे. शासनाने यांना विश्वासात घ्यायला हवे आहे. त्यांच्याकडे कोकण पर्यटन म्हणून काही जबाबदाऱ्या सोपवायला हव्या आहेत. जगभरातील पर्यटकाचा कोकण विषयक दृष्टीकोन नकारार्थी होणार नाही याची काळजी घेणारं वृत्तलेखन आणि वार्तांकन होण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. कोकणात फिरताना पर्यटकांनी कचरा हा कचरा पेटीत टाकावा. पर्यटनस्थळाच्या पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, असे वर्तन असावे. ऐतिहासिक पर्यटनस्थळी आपली नावे लिहिण्याचा मोह टाळावा. तीर्थक्षेत्री अस्वच्छता टाळावी. स्थानिक संस्कृतीची चेष्टा करू नये, यांसारख्या विषयांवर वेळ देऊन काम व्हायला हवं आहे. यासाठी शासनाच्या सहकार्याची आवश्यकता आहे. कोकणी माणसे पर्यटन साक्षर व्हायला हवी आहेत. गुहागर, आरेवारे, कुणकेश्वर, तारकर्ली, वर्सोली, दिवेआगर, केळवा आणि बोर्डी येथे बीचशॅक्ससारख्या नव्याने जन्माला येणाऱ्या संकल्पनांना आम्ही थेट गोव्याशी जोडण्यापूर्वी त्यांची कोकणातील मांडणी स्पष्ट करायला हवी आहे. अन्यथा कोकणातील समुद्र किनाऱ्यांवर झावळीच्या झोपड्यांमधील बीचशॅक म्हणजे मुली-बाळी निवांत फिरू न शकणारे, कोकणच्या मूळ संस्कृतीला बाधा आणणारे पर्यटन अशी त्यांची ओळख बनेल. कदाचित ती अधिक त्रासदायक ठरेल.

कोकणच्या सागर किनाऱ्यावरून मुंबई ते गोवा जाणाऱ्या देशातील पहिल्या लक्झरियस क्रुज सेवेला कोकणात थांबा नाही आहे. जलवाहतुकीद्वारे पर्यटन सेवेत असलेल्या कोर्डेलिया क्रूझया कंपनीशी भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी)करार केला आहे. या पार्श्वभूमीवर कोकणात क्रूझ टर्मिनलची आवश्यकता असणार आहे. पर्यटनाच्या या नव्या आयामाला शुभेच्छा देताना याच कोकणातल्या दाभोळ बंदराची माहिती घ्यायला हवी आहे. दाभोळ ते गोवळकोट (चिपळूण) बंदरांचे अंतर ३० नॉटिकल मैल अर्थात ४४ किमी आहे. चिपळूणची ही वाशिष्ठी नदी ज्या दाभोळ खाडीला जाऊन मिळते ते भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील सर्वाधिक प्राचीन, शक्तिशाली बंदर आहे. २६ जानेवारी १९३७ ला जगातील सर्वात नामांकित नौकायानतज्ञ डच लोकांनी या बंदराची पाहाणी केली होती. भारतातील सर्वात सुरक्षित बंदर म्हणून असलेला उल्लेख त्यांनीही मान्य केला होता. १०८ फूट खोल, २५ मैल लांब या खाडीत एकावेळी दोन-तीन टनांच्या किमान १०० कार्गोज उभ्या राहू शकतात. सन १९५०पर्यंत गत ३०० वर्षांत ही निरीक्षणे अनेकांनी नोंदवलीत. त्या वेळी मुंबई-न्हावाशेवा जन्मली नव्हती. सन १८०८ साली अमेरिकेतील बोस्टन येथे प्रसिद्ध झालेल्या विश्व गॅझेटिअरमध्येही दाभोळ संदर्भात अनेक वैशिष्ट्यपूर्ण ओळी आहेत. इतक्या नैसर्गिक नोंदी उपलब्ध असताना आम्ही निसर्ग ऱ्हासाचे प्रकल्प कोकणात का आणतो? वर्षा ऋतूतील कोकणी निसर्ग आणि धबधब्यांविषयी चर्चा करताना ही स्थळे पर्यटक कुटुंबीयांना पर्यटनासाठी सुरक्षित वाटायला हवीत.

मुंबईत जागतिक दर्जाचे मत्स्यालय सुरू करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. तिथे असे भव्य प्रकल्प असणे काही गैर नव्हे, मात्र एकट्या मुंबईवर आपण प्रकल्पांचा अजून किती ताण देणार आहोत? आणि मुंबईच्या शेजारी असलेल्या कोकणाकडे ममत्वाने कधी पाहाणार? सर्वसमावेशक विचार झाल्यास इथल्या पर्यटन दिनाचे भविष्य उज्ज्वल आहे.

**-धीरज वाटेकर**

# माणगाव बसस्थानकातील खड्ड्यांविरोधात भाजपचा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव बसस्थानकाची अत्यंत दुरवस्था झाली असून या स्थानकाला कोणीच वाली राहिला नसल्याचे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. या स्थानकात रस्त्यावर जागोजागी मोठमोठे प्रचंड खड्डे पडले असून पावसाळ्यात या खड्ड्यांतून पाणी साचून डबकी तयार झाली आहेत. स्थानकात येणाऱ्या बसेस झोला मारत असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या खड्ड्यांच्या समस्येबाबत माणगाव तालुका भाजपचे अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी आक्रमक भूमिका घेत तालुका भाजपतर्फे १ नोव्हेंबर रोजी स्थानकात येणाऱ्या बसेस आडवून रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. भाजपच्या या आंदोलनाला माणगाव तालुका पत्रकार संघाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी सांगितले.

### तालुका पत्रकार संघाचा पाठिंबा

माणगाव हे दक्षिण रायगडातील मध्यवर्ती असे महत्त्वाचे ठिकाण आहे. बसस्थानकाची अत्यंत दुरवस्था झाली असून बसस्थानकासमोर रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने त्यात पावसाचे पाणी साचून डबकी तयार झाली आहेत. या समस्येकडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. कोणी येथील खड्ड्यांबाबत आवाज उठविल्यास तेवढ्यापुरती डागडुजी करण्यात येते, मात्र चांगल्या प्रकारे हा रस्ता तयार करण्यात येत नाही. आता या प्रश्नाबाबत तालुका भाजपतर्फे अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी आक्रमक भूमिका घेत हा रस्ता लवकरात लवकर चांगल्या दर्जाचा न केल्यास १ नोव्हेंबर २०२१ रोजी बसेस आडवून रास्ता रोको आंदोलनाचा इशारा तालुका भाजपतर्फे दिला आहे. भाजपच्या या आंदोलनास तालुका पत्रकार संघाने पाठिंबा दिला असून जोपर्यंत हा रस्ता चांगल्याप्रकारे होत नाही तोपर्यंत काहीही झाले, तरी चालेल आंदोलन मागे घेणार नाही, असा इशारा भाजप व तालुका पत्रकार संघातर्फे परिवहन महामंडळाला देण्यात आला आहे.

# मंगेश दळवी यांचा मध्य रेल्वेकडून सन्मान

**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील नेरळ-शेलू रेल्वेस्थानकात कमर्शियल सुपरवायझर म्हणून कार्यरत असलेले रेल्वे कर्मचारी मंगेश दळवी यांचा मध्य रेल्वेकडून सन्मान करण्यात आला आहे. या सन्मानाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागीय व्यवस्थापक यांच्याकडून मध्य रेल्वेमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी आणि अधिकारीवर्गामधून सर्व विभागात उत्कृट सेवा देणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांना डीआरएम पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. गेली १२ वर्षे मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील विविध स्थानकात कमर्शियल विभागात सुपरवायझर म्हणून काम करणारे मंगेश दळवी यांना या वर्षीचा डीआरएम पुरस्कार मिळाला आहे.

(छाया : संतोष पेरणे)




मेन लाईनवरील कर्जत एन्डकडील शेलू-नेरळ येथे कमर्शियल सुपरवायझर असलेले मंगेश दळवी यांना मध्य रेल्वेचे मुंबई विभागीय यांच्या हस्ते डीआरएम पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दळवी यांच्या या कामगिरीबद्दल शेलू-नेरळ-कर्जत विभागात कौतुक होत आहे. अनेकांनी त्यांचे फोन तसेच सोशल मीडियातून अभिनंदन केले.

# समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची गरज -तहसीलदार आयुब तांबोळी

**खालापूर/खोपोली : प्रतिनिधी**

समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक पात्रता गरजेची असून, आपल्या समस्या व शैक्षणिक कार्यासाठी महसूल विभाग सर्वोतोपरी मदत करील अशी ग्वाही खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी शनिवारी (दि. २५) येथे दिली.

चिरनेर जंगल सत्याग्रह स्मृतिदिन व हुतात्मा दिनानिमित्त खालापूर येथील आदिवासी भवनात शनिवारी आदिवासी दिन साजरा करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमात चिरनेर सत्याग्रहातील हुतात्मा नाग्या महादू कातकरी, हुतात्मा बिरसा मुंडा व हुतात्मा भागोजी भागरे यांच्या प्रतिमांचे तहसीलदार आयुब तांबोळी व नायब तहसीलदार राजश्री जोगी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास पवार यांनी तर सूत्रसंचालन दिलीप डाके यांनी केले. स्थानिक आदिवासी नेते मारुती पवार, जयवंत शिद, शकुंतला पवार, संतोष जाधव, लक्ष्मण वाघमारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

बबन पवार, अनंता वाघे, रवी होला, शंकर होला यांच्यासह आदिवासी युवकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मदत केली.




# गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना शिबिरास उत्तम प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

रिलायन्स फाऊंडेशन आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज कृषी यांत्रिकीकरण योजना, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना शिबिराचे आयोजन गावागावात करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

या वेळी सहाय्यक कृषी अधिकारी धनंजय सरदेसाई यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना, शेतकऱ्यांनी कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे व शेतीमधील ऊर्जेच्या वापराचे प्रमाण हेक्टरी दोन



किलोवॅटपर्यंत वाढविणे, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांपर्यंत कृषी यांत्रिकीकरणाचा लाभ पोहोचविणे, शेतकरी अनु. जमाती, तसेच महिला शेतकरी ५० टक्के इतर वर्गासाठी ४० टक्के अनुदान राहील. कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजनेतून कृषी यंत्र, अवजारे यांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. जसे ट्रॅक्टर, पॉवर लिटर, चलित अवजारे, मनुष्य चलित यंत्र, अवजारे, प्रक्रिया संच, काढणी पश्चात तंत्रज्ञान, फलोत्पादन यंत्र अवजारे, वैशिष्ट्यपूर्ण यंत्र अवजारे याबाबतची सविस्तर माहिती दिली.

गोपीनाथ मुंडे अपघात विमा, कर्कनी यंत्र, फळबाग लागवड, त्याचबरोबर www.mahadbt.com पोर्टल या मार्गदर्शनाबरोबरच रिलायन्स फाऊंडेशनच्या कार्यक्रमासंदर्भात योगेश मेंडाकर यांनी माहिती दिली.

# मुरूड तालुका भंडारी बोर्डिंगच्या विश्वस्तपदी मोहन करंदेकर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका भंडारी बोर्डिंगची जनरल सभा श्रीकांत सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रमुख विश्वस्त निशिकांत खोत यांनी विश्वस्तपदी मोहन करंदेकर, अशोक पाटील, राजेंद्र पुलेकर, विलास खोत, ऋषिकांत डोंगरीकर, रवी कासेकर यांच्या नावाची घोषणा केली.

मोहन करंदेकर हे सामाजिक, क्रीडा व धार्मिक क्षेत्रात कामगिरी करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल मुरूड तालुका भंडारी बोर्डिंगच्या अध्यक्ष व कार्यकारी मंडळानी घेऊन त्यांची विश्वस्तपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या वेळी मुरूड तालुका भंडारी बोर्डिंगचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, उपाध्यक्ष शंकर खेडेकर, महेंद्र भाटकर, सचिव भालचंद्र घुमकर व समाज बांधव उपस्थित होते. सभा सुरू होण्यापूर्वी समाजातील ज्ञाती बांधव जे कोरोना महामारीत मृत्युमुखी पडले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

(छाया : संजय करडे)







**अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन : कोरोनाचा प्रादूर्भाव कमी होत असल्याने पर्यटकांची पावले समुद्रावर वळली आहेत. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत आहे. अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यातील किनारे शनिवार व रविवार असे दोन दिवस पर्यटकांनी गजबजलेले होते. जंजिरा किल्ला बंद असल्याने पर्यटक परिसरात फोटोग्राफी करीत आहेत. दरम्यान, पर्यटक पुन्हा येऊ लागल्याने स्थानिक व्यावसायिकही आनंदित आहेत.** (छाया : जितू शिगवण, नितीन शेडगे, अमेय नाझरे)

# कर्जत उपजिल्हा रुग्णालय कोरोनाच्या तिसऱ्या लाटेसाठी सज्ज

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील कोविड रुग्णांवर उपचार करण्यासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात ५० खाटा उपलब्ध होत्या. सध्या कोरोनाचे रुग्ण कमी प्रमाणात आढळत असले, तरी संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन कर्जतच्या उपजिल्हा रुग्णालयाने खबरदारीचा उपाय म्हणून आपली आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

मागील वर्षात कोरोना वर मात करण्यासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयाने महत्त्वाची भूमिका बजावली होती.त्या वेळी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात कोविड रुग्णांसाठी ५० खाटा तयार ठेवण्यात आल्या होत्या, त्यात डिसेंबर २०२० मध्ये कर्जत उपजिल्हा रुग्णालयात केंद्र शासनाच्या पीएम केअर फंडातून आणि स्थानिक आमदार यांच्या निधीमधून व्हेंटिलेटर उपलब्ध झाले होते. त्यातून आयसीयू व्हेंटिलेटरसह परिपूर्ण असलेला १० बेडचा विशेष वॉर्ड तयार करण्यात आला होता. त्यात तिसरी लाट ही लहान मुलांना बाधा पोहचविणारी आहे, असे आरोग्य यंत्रणेने सांगितल्यानंतर शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून कर्जत उपजिल्हा रुग्णालयात १० बेडचा विशेष वॉर्ड कोविड मध्ये लहान मुलांवर उपचार करण्यासाठी सिद्ध केला. त्या वॉर्डमध्ये मिनी व्हेंटिलेटर आणि लहान मुलांसाठी खेळणी उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यात कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांनी परिसरातील रिसॉर्ट मालकांच्या माध्यमातून कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता वॉर्ड, कोविड वॉर्ड आणि लहान मुलांसाठी बनविण्यात आलेले वॉर्ड यांना कोणताही खंड न पडता ऑक्सिजन पुरवठा व्हावा यासाठी सेंट्रल ऑक्सिजन सिस्टीम कार्यान्वित करून घेतली आहे. २०२० मध्ये अशी सुविधा कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नव्हती, त्या वेळी ऑक्सिजनची गरज असलेल्या रुग्णांना सिलेंडरमधून ऑक्सिजनचा पुरवठा केला जात होता.

आता कर्जत विधानसभा आमदार निधीमधून कोविड रुग्णांसाठी सर्व सोयीसुविधा यांनी परिपूर्ण असा कोविड वॉर्ड तयार होत आहे. त्या नवीन वॉर्डमध्ये ३० बेड आणि सेंट्रल ऑक्सिजनची सुविधा दिली गेली आहे. त्या वॉर्डचे लोकार्पण अद्याप झाले नाही, परंतु कोविडची तिसरी लाट आल्यास कर्जत उपजिल्हा रुग्णालय पूर्ण क्षमतेने तयार आहे. नवीन वॉर्डचे लोकार्पण लवकरच केले जाणार असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांनी दिली. दरम्यान, कर्जतसारख्या आदिवासी आणि ग्रामीण भागातील जनतेसाठी कोविड रुग्णांवर मुंबई किंवा नवी मुंबईत जाऊन उपचार घेण्याची गरज भासणार नाही, असे नियोजन असून कोविडच्या तिसऱ्या लाटेसाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालय सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

(छाया : संतोष पेरणे)




(छाया : धम्मशील सावंत)



## हुतात्मा पुण्यतिथीनिमित्त स्वच्छता अभियान

**पाली : प्रतिनिधी**

हुतात्मा नाग्या महादू कातकरी पुण्यतिथीनिमित्त सिद्धेश्वर आदिवासी वाडीतील महिलांनी स्वच्छता अभियान राबविले. हातात झाडू घेऊन या महिलांनी वाडीवरील सर्व परिसर स्वच्छ केला, तसेच ठिकठिकाणी वाढलेले गवत व झाडीझुडपे कापून टाकली. या वेळी महिलांची चांगली एकजूट पहायला मिळाली. हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांची पुण्यतिथी अशा विधायक प्रकारे साजरी केल्याबद्दल सरपंच उमेश यादव यांनी सर्व आदिवासी महिलांचे कौतुक केले.

## अखेर विहूर पुलाजवळ खड्डा बुजविण्याचे काम सुरू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड–मुंबईला जोडणाऱ्या महत्त्वाच्या अशा विहूर पुलाकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे जिकिरीचे असते. विहूर पुलावरून मुंबईकडे जाणारा हा महत्त्वाचा मार्ग आहे, परंतु अतिवृष्टीमुळे या पुलाकडील संरक्षक भिंतीमधील माती वाहून गेल्याने मोठा खड्डा तयार झाला आहे. जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे ही माती ज्या वेळी वाहून गेली होती. त्या वेळी तातडीने या पुलाची डागडुगी करून भराव भरून हा पूल पूर्वस्थितीत आणला गेला होता, परंतु ८ सप्टेंबर रोजी ५४७ मिमी पाऊस झाल्याने पुन्हा त्याच जागेतील माती वाहून गेल्याने पूर्वीपेक्षा मोठा खड्डा तयार झाला आहे. सध्या या पुलावरून एकेरी वाहतूक सुरू आहे.

याबाबत अनेक वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम खात्याला जाग आली असून त्यांनी हा खड्डा भरण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. विहूर पुलानजीक पडलेला खड्डा बुजवताना सार्वजनिक बांधकाम खात्याला काँक्रिटच्या संरक्षक भिंत बांधण्याचा मात्र विसर पडला आहे. कारण जर पुन्हा जोरदार पाऊस आल्यास ही माती निघून जाऊन पुन्हा याच ठिकाणी खड्डा तयार होणार आहे. यासाठी विहूर पुलास काँक्रिटची संरक्षक भिंत खूप आवश्यक होती, परंतु सध्या फक्त खड्डा भरून तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पुढील पावसाळ्यात याच संकटाचा सामना करावा लागणार आहे. सध्या पुलाचा खड्डा भरण्याच्या कामाने वेग घेतल्याचे दिसून येत आहे.



## जिल्हास्तरीय कृषी मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शेतकरी वर्गासाठी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ व यू.पी.एल. यांच्या संयुक्त विद्यमाने अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय कृषी मेळावा श्री समर्थ कृपा वृद्ध धाम परहुर येथे आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कोरोना काळात गेल्या वर्षी शेतमालाची विक्री व्यवस्था सुरळीत करण्यासाठी राज्य सरकारने मोलाची मदत केली होती, परंतु या वर्षी राज्य सरकारने फारसे निर्बंध घातले नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यास मदत मिळाली. त्यात अनेक ठिकाणी ऑनलाईन विक्री करण्यात आली. अलिबाग, मुरूड येथील शेतकरी नावीन्यपूर्ण शेती करताना दिसत आहेत.

शेतकऱ्यांना पीक फवारणीचे प्रात्यक्षिक व औषधांच्या मात्रा समजावून देण्यासाठी कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी या वेळी तंत्रशुद्ध मार्गदर्शन केले. नैसर्गिक आपत्तीत देखील टिकून राहता यावे अशी पीक पद्धती अंगीकारावी, असे मेळाव्यात सांगण्यात आले. तसेच शेतात येणाऱ्या शेतमालाची शहरी भागातील बाजारात विक्री करण्यासाठी लागणारी विक्रीसाखळी व्यवस्था उभारणेबाबत मोलाचे मार्गदर्शन कृषी अधिकाऱ्यांनी केले. या वेळी शेतकरी बांधवांनी आपल्या पिकांवरील रोगांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

या कृषी मेळाव्यात कृषी अधिकाऱ्यांकडून रायगड जिल्ह्यातील प्रयोगशिल शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे असोसिएट डीन डॉ. यू. व्ही. महाडकर, रायगडचे उपविभागिय कृषी अधिकारी कैलास वानखेडे, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल, कृषी कमिटी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य आदी या शेतकरी मेळाव्यास उपस्थित होते.



## विवाहितेच्या छळप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील सावरसई येथील रानशेत वडाची वाडीत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीला आरोपी पती अनंत लहू निरगुडा, सासरा लहू निरगुडा, सासू हाशी निरगुडा, नणंद दामिनी निरगुडा यांनी संगनमत करून आई–वडिलांकडून मोटरसायकल, गॅस, खोली घेण्यासाठी पैसे घेऊन ये, अशी वेळोवेळी मागणी करून ती पूर्ण न केल्याने शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केली. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सुरू आहे.

## अलिबागेत इमारतीच्या पंपहाऊसमध्ये मृतदेह

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील जुन्या नगरपालिकेसमोरील निशा अपार्टमेंट या इमारतीच्या पंप हाऊसमध्ये एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. भरवस्तीत हा मृतदेह आढळल्याने शहरात खळबळ उडाली असून हा खून आहे की आत्महत्या याचीच चर्चा शहरात सुरू झाली आहे.

बालाजी नाक्यावरील ही इमारत मुख्य रस्त्यालगत असली तरी इमारतीत आणि पंपहाऊसकडे जाणारा रस्ता अतिशय चिंचोळा आहे. त्यामुळे सहजासहजी तिकडे कुणी फिरकत नाही. आज दुपारच्या सुमारास कचरा वेचणाऱ्या महिलेच्या तो दृष्टीस पडला. त्यानंतर या प्रकरणाचा बोभाटा झाला. पोलिसांना तातडीने पाचारण करण्यात आले. इमारतीजवळ नागरिकांची गर्दी झाली होती. मृत व्यक्ती साधारण ३० ते ३५ वयोगटातील असून मृतदेहाला प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. त्यामुळे ३ ते ४ दिवसांपासून हा मृतदेह तिथे पडलेला असावा असा अंदाज आहे. मृतदेहाची स्थिती पाहता हा खून असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने पोलिसांनी पंपहाऊसमधून हा मृतदेह बाहेर काढून ताब्यात घेतला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## खालापूर लोक अदालतमध्ये एक हजार प्रकरणे निकाली

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर दिवाणी न्यायालय येथे लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. त्यात ११४३ प्रकरणांचा निकाल लावून एक कोटी २० लाख २७ हजार ६९४ रुपयांची वसुली करण्यात आली.



खालापूर येथे दिवाणी कनिष्ठस्तर न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये दिवाणी, फौजदारी, वादपूर्व प्रकरणे व गुन्हा कबुली अशी एकूण ४२९९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ११४३ प्रकरणे निकालात काढून सुमारे सव्वा कोटीची वसुली करण्यात आली.

पंच म्हणून दिवाणी न्यायाधीश आर. डी. बावले, सहदिवाणी न्यायाधीश पी. एम. माने, सहन्यायाधीश एल. के. सपकाळ, सचिव तथा विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांनी काम पाहिले. वकिलांकडून सिद्धेश जितेकर, स्वाती म्हात्रे, पी.एल.व्ही. अधिकारी संजय सांगले, मिलिंद पारठे, तर सरकारी वकील कल्पना फोंडके, सहअधीक्षक सुभद्रा चव्हाण यांनी कामकाज पाहिले. एकूण वसुलीपैकी ग्रामपंचायत घरपट्टी ७३,८३,३६६ व पाणीपट्टी ५,७४,५४० एवढी वसुली करण्यात ग्रामपंचायत विभाग यशस्वी झाला. उर्वरित खोपोली नगरपालिका व खालापूर नगरपंचायत यांची वसुली झाली. वकील मिलिंद सुरावकर, सचिन चाळके, विकास म्हात्रे, दांडगे, शहनवाज खान, मयूर कांबळे, आरती गुप्ता, सरिता वाघमारे व अन्य वकील, तसेच न्यायालयातील सर्व कर्मचारी उपस्थित राहून कामकाज सुरळीत पार पडले.


### जाहीर नोटीस

एलवगोवर मुरगेसन वलावर व अमरावती एम. मुरगेसन, रा. रुम नं. ३, एफ सेक्टर, आय टू लाईन, चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई यांना ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

तुम्ही आमचे अशिल श्री. एल. आर. वेंकटरामण ऑफीस ५०१, भूमी लॅन्डमार्क बिल्डींग, प्लॉट नं. ३४/३४अे, सेक्टर १७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल यांचेकडून खालील वर्णनाचा फ्लॅट त्यांच्या पोयंजे येथील ईडन गार्डन प्रोजेक्टमधून विकत घेण्याचे ठरविले होते.

**फ्लॅटचे वर्णन**

| मौजे | फ्लॅट नं. | बिल्डींग नं. | विंग | क्षेत्र (चौ.मी.) कारपेट |
|---|---|---|---|---|
| ईडन गार्डन पोयंजे | १०३ | १ | बी | ३२.१८ |

सदर फ्लॅट बुकिंग करतेवेळी फक्त रु. ५०,०००/– (पन्नास हजार रुपये) इतकी रक्कम भरुन तुम्ही आमचे अशिलांकडून वरील वर्णनाचा फ्लॅट बुक केला होता. त्या अनुषंगाने आमचे अशिलांनी दि. १२/१०/२०१८ रोजी तुम्हास सदर फ्लॅटचा नोंदणीकृत करार लिहून दिलेला होता. सदर फ्लॅटचा मुळ मोबदला रु. २१,२८,०००/– (एकवीस लाख अठ्ठावीस हजार रुपये) तुम्ही आमचे अशिलांना देण्याचे होते. त्यापैकी काही रक्कम तुम्ही आमचे अशिलांना दिलेली आहे. उर्वरीत थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी आमचे अशिलांनी तुम्हास दि.– ०५/०१/२०२१, २१/०१/२०२१ व ११/०२/२०२१ रोजी लेखी पत्र पाठविली. तसेच दि. २३/०८/२०२१ रोजी ॲड. वाय. एस. भोपी पनवेल यांचेमार्फत तुम्हास तुमच्या फ्लॅटसंबंधी दि. १२/१०/२०१८ रोजीचा नोंदणीकृत करार रद्द करण्यासंबंधीची कायदेशीर नोटीस पाठविली. परंतु तुम्ही आमचे अशिलांच्या पत्रास व नोटीसीस कोणतेही उत्तर दिले नाही अगर फ्लॅटच्या मोबदल्याची वर वर्णन केलेली रक्कम अदा केली नाही. सबब तुम्हास फ्लॅट खरेदीमध्ये रस नाही असे गृहित धरुन आमचे अशील तुमचे बरोबरचा दि. १२/१०/२०१८ रोजीचा फ्लॅट खरेदीबाबतचा नोंदणीकृत करार रद्द करीत आहेत. करार रद्द करण्यासाठी व त्रयस्थ इसमांच्या नावे फ्लॅट करण्यासाठी तसेच फ्लॅटवर चार्ज निर्माण करण्यासाठी ओनरशीप ऑफ फ्लॅट ॲन्ड अपार्टमेन्ट कायद्याअंतर्गतची कलम ९ व १२ ची नोटीस तुम्हास यापूर्वी दिलेली आहे. मात्र सदर पत्रांना व नोटीसीला तुम्ही उत्तर दिलेले नाही अगर संमती दिलेली नाही. सबब सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

या जाहीर नोटीसीने तुम्हास असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी तुमचेबरोबर केलेला दि. १२/१०/२०१८ रोजीचा करार रद्द केलेला आहे. सदरकामी ७ दिवसात तुमची संमती तुम्ही आमचे अशिलांना लेखी स्वरुपात सादर करावी. न केल्यास ७ दिवसानंतर आमचे अशील तुमचे बरोबरचा फ्लॅटचा दि. १२/१०/२०१८ रोजीचा करार रद्द झालेला आहे असे समजून सदर फ्लॅटचा नवीन व्यवहार तिऱ्हाईत इसमांबरोबर करतील. मात्र त्यानंतर आलेली तुमची हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, ह्याची नोंद घ्यावी.

**पनवेल**
**तारीख : २५.०९.२०२१**

**सही/–**
**ॲड. वाय. एस. भोपी**
**पत्ता :– गाळा नं. १३५, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल नं. ९८२०२७३६९१**

### जाहीर नोटीस

सौ. बुमादेवी सरवनन व श्री. सरवनन थंगराज पडायची, रा. रुम नं.९, जी सेक्टर, एच थ्री लाईन, चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई यांना ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

तुम्ही आमचे अशील श्री. एल. आर. वेंकटरामण ऑफिस ५०१, भूमी लॅन्डमार्क बिल्डींग, प्लॉट नं. ३४/३४अे, सेक्टर १७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल यांचेकडून खालील वर्णनाचा फ्लॅट त्यांच्या पोयंजे येथील सुंदर रेसिडेन्सी प्रोजेक्टमधून विकत घेण्याचे ठरविले होते.

**फ्लॅटचे वर्णन**

| मौजे | फ्लॅट नं. | बिल्डींग नं. | विंग | क्षेत्र (चौ.मी.) कारपेट |
|---|---|---|---|---|
| सुंदर रेसिडेन्सी पोयंजे | ३०२ | १ | बी | ३१.९६ |

सदर फ्लॅट बुकिंग करतेवेळी फक्त रु. २५,०००/– (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम भरुन तुम्ही आमचे अशिलांकडून वरील वर्णनाचा फ्लॅट बुक केला होता. त्या अनुषंगाने आमचे अशिलांनी दि. ०४/०१/२०१९ रोजी तुम्हास सदर फ्लॅटचा नोंदणीकृत करार लिहून दिलेला होता. सदर फ्लॅटचा मुळ मोबदला रु. २२,६१,०००/– (बावीस लाख एकसष्ट हजार रुपये) तुम्ही आमचे अशिलांना देण्याचे होते. त्यापैकी काही रक्कम तुम्ही आमचे अशिलांना दिलेली आहे. उर्वरीत थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी आमचे अशिलांनी तुम्हास दि.– ०५/०१/२०२१ व २१/०१/२०२१ रोजी लेखी पत्र पाठविली. तसेच दि. २३/०८/२०२१ रोजी ॲड. वाय. एस. भोपी पनवेल यांचेमार्फत तुम्हास तुमच्या फ्लॅटसंबंधी दि. ०४/०१/२०१९ रोजीचा नोंदणीकृत करार रद्द करण्यासंबंधीची कायदेशीर नोटीस पाठविली. परंतु तुम्ही आमचे अशिलांच्या पत्रास व नोटीसीस कोणतेही उत्तर दिले नाही अगर फ्लॅटच्या मोबदल्याची वर वर्णन केलेली रक्कम अदा केली नाही. सबब तुम्हास फ्लॅट खरेदीमध्ये रस नाही असे गृहित धरुन आमचे अशील तुमचे बरोबरचा दि. ०४/०१/२०१९ रोजीचा फ्लॅट खरेदीबाबतचा नोंदणीकृत करार रद्द करीत आहेत. करार रद्द करण्यासाठी व त्रयस्थ इसमांच्या नावे फ्लॅट करण्यासाठी तसेच फ्लॅटवर चार्ज निर्माण करण्यासाठी ओनरशीप ऑफ फ्लॅट ॲन्ड अपार्टमेन्ट कायद्याअंतर्गतची कलम ९ व १२ ची नोटीस तुम्हास यापूर्वी दिलेली आहे. मात्र सदर पत्रांना व नोटीसीला तुम्ही उत्तर दिलेले नाही अगर संमती दिलेली नाही. सबब सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

या जाहीर नोटीसीने तुम्हास असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी तुमचे बरोबर केलेला दि. ०४/०१/२०१९ रोजीचा करार रद्द केलेला आहे. सदरकामी ७ दिवसात तुमची संमती तुम्ही आमचे अशिलांना लेखी स्वरुपात सादर करावी. न केल्यास ७ दिवसानंतर आमचे अशील तुमचे बरोबरचा फ्लॅटचा दि. ०४/०१/२०१९ रोजीचा करार रद्द झालेला आहे असे समजून सदर फ्लॅटचा नवीन व्यवहार तिऱ्हाईत इसमांबरोबर करतील. मात्र त्यानंतर आलेली तुमची हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, ह्याची नोंद घ्यावी.

**पनवेल**
**तारीख : २५.०९.२०२१**

**सही/–**
**ॲड. वाय. एस. भोपी**
**पत्ता :– गाळा नं. १३५, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल नं. ९८२०२७३६९१**

# हैदराबादचे आव्हान संपुष्टात

## आयपीएलमध्ये पंजाबचा विजय; होल्डरची झुंज अपयशी



**शारजा : वृत्तसंस्था**

जेसन होल्डरच्या (३/१९ आणि नाबाद ४७) अष्टपैलू खेळानंतरही पंजाब किंग्जविरुद्ध आयपीएलमध्ये शनिवारी रात्री झालेल्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादला पराभव पत्करावा लागला. नऊ सामन्यांत आठव्या पराभवामुळे हैदराबादचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

पंजाब किंग्जने २० षटकांत ७ बाद १२५ धावा केल्या. यात कर्णधार के. एल. राहुल (२१) व एडीन मार्करमचे (२७) महत्त्वाचे योगदान होते. त्यानंतर हैदराबादला २० षटकांत ७ बाद १२० धावाच करता आल्या. मोहम्मद शमीने डेव्हिड वॉर्नर (२) आणि कर्णधार केन विल्यम्सन (१) यांना झटपट माघारी धाडले. मधल्या षटकांत फिरकीपटू रवी बिष्णोईने २४ धावांत तीन बळी घेत हैदराबादला अडचणीत टाकले. उत्तरार्धात होल्डरला वृद्धिमान साहा (३१) वगळता इतरांची साथ लाभली नाही.

**संक्षिप्त धावफलक**

पंजाब किंग्ज : २० षटकांत ७ बाद १२५ (एडीन मार्करम २७, के. एल. राहुल २१; जेसन होल्डर ३/१९) विजयी वि. सनरायजर्स हैदराबाद : २० षटकांत ७ बाद १२० (जेसन होल्डर नाबाद ४७; रवी बिष्णोई ३/२४)

# चेन्नई एक्स्प्रेस सुसाट! कोलकात्यावर मात

**अबूधाबी : वृत्तसंस्था**

आयपीएलमधील अटीतटीच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सने कोलकात्याला दोन गडी राखून नमवले. कोलकात्याने सात गडी गमवून विजयासाठी १७२ धावांचे आव्हान दिले होते. हे आव्हान चेन्नईने आठ गडी गमवून पूर्ण केले. या विजयासह चेन्नईचा संघ आयपीएल गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचला. शेवटच्या षटकात आक्रमक खेळी करत रवींद्र जडेजाने संघाला विजय मिळवून दिला. जडेजाने आठ चेंडूंत दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २२ धावा केल्या.

कोलकाताने दिलेल्या १७२ धावांचा पाठलाग करताना चेन्नईच्या सलामी जोडीने संघाला चांगली सुरुवात करून दिली. ऋतुराज गायकवाड आणि फाफ ड्युप्लेसिसने पहिल्या विकेटसाठी ७४ धावांची भागीदारी केली. ऋतुराज ४० धावा करुन परतल्यानंतर फाफ ड्युप्लेसिसही ४३ धावा करून माघारी फिरला. त्यानंतर मोईन अलीने ३२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. अंबाती रायडू १०, सुरेश रैना ११ आणि महेंद्रसिंह धोनी अवघ्या एका धावेवर परतल्यानंतर सामना कोलकाताच्या बाजूने झुकला होता, पण रवींद्र जडेजाने दोन चौकार आणि दोन षटकार खेचत सामना पुन्हा चेन्नईच्या बाजूने वळवला. अखेरच्या षटकात सुनील नरेन याने त्याला पायचीत करीत सामना परत एकदा रंगतदार स्थितीत आणला, पण लॉर्ड शार्दुल ठाकूरने कोणतीही चूक न करता संघासाठी विजयी धाव घेतली.

## आरोग्य प्रहर

# व्यायाम केल्यानंतर 'या' गोष्टी कटाक्षाने पाळा

निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा व्यायाम आहे. बरेच जणे तंदुरुस्त राहण्यासाठी जिममध्ये जातात, मात्र व्यायाम करून आल्यावर अनेक चुका करतात. ज्यामुळे आपण केलेल्या व्यायामाचा काहीही उपयोग होत नाही.

**हायड्रेटेड ठेवा –** बहुतेक लोक त्यांच्या दैनंदिन दिनक्रमात पुरेसे पाणी पीत नाहीत. शरीराला निर्जलीकरणापासून वाचवण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे. या व्यतिरिक्त, द्रवपदार्थ वेळोवेळी आहारात घ्यावेत. जर तुम्ही जास्त व्यायाम करत असाल तर काही वेळानंतर तुम्ही पुरेसे पाणी प्यावे.

**आराम करा –** व्यायाम केल्यानंतर नेहमी थोडा वेळ विश्रांती घ्या. जर तुम्हाला वर्कआउट करताना कोणत्याही प्रकारची समस्या येत असेल तर त्या वेळी थांबा. याशिवाय जर तुम्ही धावत असाल तर काही काळ चाला.

**गोड पदार्थ –** व्यायामानंतर साखरयुक्त पदार्थांचे सेवन करू नये. आपण जास्त कॅलरी वापरणे टाळावे. व्यायाम केल्यानंतर तुम्ही दही खाऊ शकता.

**फायबरयुक्त आहार घ्या –** पाचक प्रणाली सुधारण्यासाठी उच्च फायबर आहार आवश्यक आहे. फळे खा आणि हिरव्या भाज्या खा. याशिवाय ग्रीन टी प्या.

# सायकल रॅलीला पनवेलमध्ये प्रतिसाद; स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त स्वच्छतेचा संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील इन्फिनिटी फाऊंडेशन, पनवेल महानगरपालिका, रायगड जिल्हा परिषद, आदई ग्रुप ग्रामपंचायत आणि नेहरू युवा केंद्र संघटन अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्दिष्ट स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि स्वच्छ भारत अभियान हे होते.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे सहाय्यक आयुक्त विधाते, पंचायत समितीच्या सहाय्यक गटविकास अधिकारी मोहिते, मनपा मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, उपाध्यक्ष मुग्धा म्हात्रे, सरचिटणीस पवित्र शेरावत आदी उपस्थित होते.

या सायकल रॅलीमध्ये पनवेल सायकलिंग क्लब, पुश ॲण्ड पेडल, पेडल सिटी, केकेसीसी व रनथोन क्लब यांनी सहभाग घेतला. यात १०० सायकलपटूंचा समावेश होता. रॅलीला पनवेल महापालिकेच्या कार्यालयापासून सुरुवात झाली आणि आदई जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी समारोप झाला. सहभागी क्लबना सन्मानचिन्ह देऊन व सर्व सायकलपटूंना पदक व चषक देण्यात आले.



# खो खो : महाराष्ट्राला सलग सातवा दुहेरी मुकुट

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

येथील बिजू पटनाईक इनडोअर स्टेडियमवर झालेल्या ४०व्या कुमार–कुमारी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांनी ३६व्यांदा अंतिम फेरीत प्रवेश करताना ३२वे विजेतपद मिळवले. अंतिम फेरीत त्यांनी दिल्लीचा ११–९ असा धुव्वा उडवला. मुलींनी ३६ (मुलीच्या स्पर्धा चार वर्ष उशिरा सुरू झाल्या)पैकी ३२व्यांदा अंतिम फेरीत पोहचून २३वे अजिंक्यपद मिळवले. उपांत्य फेरीत त्यांनी कोल्हापूरवर १२–०९ असा सहज विजय प्राप्त केला. या विजयासह महाराष्ट्राने सलग सातवा दुहेरी मुकुट मिळवला.





कुमारांच्या अंतिम सामन्यात दिल्लीविरुद्ध महाराष्ट्राचा आदित्य कुदळे (२.३०, मिनिटे संरक्षण व पाच गडी), सूरज झोरे (नाबाद १.१०, नाबाद ३.४० मिनिटे संरक्षण व दोन गडी), किरण वासावे (१.४०, ३.१० मिनिटे संरक्षण व एक गडी), सिराज भावे (१.३०, १.५० मिनिटे संरक्षण), विवेक ब्राम्हणे (तीन गडी) यांच्या बहारदार खेळाने विजय सुकर झाला.

कोल्हापूरविरुद्ध मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या अश्विनी शिंदे (२.४०, ३.५०, मिनिटे संरक्षण), अंकिता लोहार (२.४०, ३.५०, मिनिटे संरक्षण), संपदा मोरे (१.३०, मिनिटे संरक्षण व दोन बळी), दीपाली राठोड (१.१० मिनिटे संरक्षण व दोन बळी), वृषाली भोये (दोन बळी) यांनी आपल्या संघाला सहज विजय मिळवून दिला.



**पनवेल : पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त रायगड जिल्हा भाजपच्या वतीने खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात सेवा व समर्पण अभियान अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, युवा नेते विश्वजीत पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



## राम प्रहर दिवाळी अंकासाठी आवाहन

दरवर्षी दिवाळी अंकात नावीन्यपूर्ण विषय हाताळून वाचकांना वैचारिक फराळाची मेजवानी देणाऱ्या दै. राम प्रहरने यंदा समाजातील लक्षणीय बदलांवर 'स्थित्यंतर' हा दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. या अंकात आरोग्य, शिक्षण, धर्मकार्य, गाव, शहर, समाज, बाजारपेठ, कोरोना काळ, डॉक्टरी, वकिली व पत्रकारिता पेशा यासह (राजकारण वगळता) इतर क्षेत्रातील बदलांचा समावेश असणार आहे. आपल्या निरीक्षणातून टिपलेल्या बदलांबाबत अभ्यासपूर्ण लेख अपेक्षित आहे. त्याचबरोबर नेहमीप्रमाणे कथा, कविता, चारोळ्या, व्यंगचित्र आदी साहित्यही असणार आहे. आपला मजकूर मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१पर्यंत ramprahar@gmail.com या मेलवर टाईप करून पाठवावा. साहित्य निवडण्याचे अधिकार संपादकीय मंडळाला असतील. अधिक माहितीसाठी ७७३८१०६००९ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा.

**–मुख्य संपादक**

जीवेत् शरदः शतम्!



मंदार कोळी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सुरज घरत

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com